सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**तळमजला, मध्यवर्ती कार्यालये, पुणे ४११००१**

**दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६**

Email: ddtpho_pune@rediffmail.com
ddtp.ho@maharashtra.gov.in


====================================================================

## -: प्रसिध्दीपत्रक :-

महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागांतर्गत पुणे / कोकण / नागपूर / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती विभागातील कनिष्ठ आरेखक (गट-क) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी दि.१७.०६.२०२५ रोजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात क्रमांक ०१/२०२५ प्रसिध्द करुन अर्हताधारक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

सदरच्या जाहीर निवेदनाद्वारे सर्व उमेदवारांना कळविण्यात येते की, नगर रचना आणि मूल्यनिर्धारण संचालनालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ आरेखक, गट-क पदासाठी दिनांक १५.०९.२०२५ रोजी एकूण ०२ सत्रांमध्ये राज्यातील नागपूर, मुंबई व पुणे अशा ०३ परीक्षा केंद्रावर ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार असून, सदरहू परीक्षेकरीता परीक्षेचे प्रवेशपत्र (Admit Card) उमेदवारांना ईमेलद्वारे प्राप्त होईल.

उमेदवारांनी परीक्षेस येताना परीक्षेचे प्रवेश पत्र (Hall Ticket) Download करुन त्याची प्रत व प्रवेश पत्रावर नमूद सूचनांप्रमाणे केवळ साहित्य व पारपत्र आकाराचे (Passport) छायाचित्र (Photo) सोबत घेऊन येणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे, सदरहू परीक्षेस येताना कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रानिक वस्तु व अन्य तद्नुषंगिक साहित्य सोबत आणू नये. याबाबत उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे कनिष्ठ आरेखक, गट-क (जाहिरात क्रमांक ०१ / २०२५) या संवर्गाच्या जाहिरातीनुषंगाने सर्वसाधारण सूचनांमधील अ.क्र.३० मध्ये नमूद केल्यानुसार, *"निर्धारीत वेळेपूर्वी गटातील सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी निर्धारीत वेळ संपली किंवा गट सादर करण्यापूर्वीच निर्धारित वेळ संपल्यास गट सिस्टीमकडुन आपोआप सादर होईल. एका गटातील प्रश्न सोडवून गट उमेदवाराने सादर केल्यानंतर / सिस्टीमद्वारे सादर झाल्यानंतर पुन्हा त्या गटामध्ये जाता येणार नाही. प्रस्तुतची प्रकिया सर्व गटांसाठी लागू राहील व अंतिमतः जरी सर्व गटांची उत्तरे सादर केली तरी, परीक्षेचा संपूर्ण वेळ संपल्यानंतरच उमेदवारास परीक्षा कक्ष सोडता येईल"*, याची सर्व उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

( विजयकुमार ल. वाघमोडे )
सदस्य सचिव,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा,
उपसंचालक,नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे.

( जितेंद्र ल.भोपळे )
अध्यक्ष,
राज्यस्तरीय निवड समिती, पुणे.
तथा
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.